# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 May 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातली मतदान प्रक्रिया सुरळीत पूर्ण
- सायंकाळी पाच वाजेपर्यंत जालन्यात सुमारे ५९ टक्के, बीड ५८ टक्के तर औरंगाबाद लोकसभा मतदार संघात ५४ टक्के मतदान
- केज विधानसभा मतदार संघातल्या कोरडेवाडीच्या ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

आणि

- केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ–सीबीएसई अभ्यासक्रमाचा बारावीचा निकाल जाहीर

****

लोकसभा निवडणुकीच्या आजच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्यांसह एक केंद्रशासित प्रदेश असं मिळून ९६ मतदारसंघांत, काही किरकोळ अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. यामध्ये मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह राज्यातल्या ११ मतदारसंघाचा समावेश आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत राज्यातल्या अकरा मतदार संघात सुमारे साडे बावन्न टक्के मतदान झालं.

जालना लोकसभा मतदार संघात सुमारे ५९ टक्के, बीड इथं सुमारे ५८ टक्के तर औरंगाबाद लोकसभा मतदार संघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५४ टक्के मतदानाची नोंद झाली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अकरा पर्यावरणस्नेही मतदान केंद्रांसह तीन हजार ८५ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे, महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे, एमआयएमचे उमेदवार सय्यद इम्तियाज जलिल, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मतदान केलं. जालना मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे, शिर्डी मतदारसंघात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील तर नंदुरबार तालुक्यातल्या नटावद इथं राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजय कुमार गावित यांनी मतदान केलं.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं सुरमाबाई थोरात या १०७ वर्षाच्या आजींनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मतदानाचा हक्क बजावला. नंदूरबार जिल्ह्यात नवापूर शहरात एका मतदान केंद्रावर इस्माईल बदुडा या ९९ वर्षीय आजोबांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

****

जालना, बीड तसंच औरंगाबाद लोकसभा मतदार संघात नवमतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. आपला हा नवीन अनुभव त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केला.

****

जालना शहरात तृतीयपंथीय मतदारांनीही प्रथमच मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

****

बीड जिल्ह्यात केज विधानसभा मतदार संघातल्या कोरडेवाडीच्या ग्रामस्थांनी मतदानावर सामुहिक बहिष्कार टाकला. ग्रामस्थांनी साठवण तलावाच्या मागणीसाठी ही भूमिका घेतल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने कोरडेवाडीला भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. मात्र ग्रामस्थ आपल्या निर्णयावर ठाम राहिल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. या समस्येवर लवकरच तोडगा काढला जाईल, अशी माहिती, बीडचे उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं पाच आणि गंगापूर इथं दोन मतदान यंत्रं बंद पडली होती. मात्र, प्रशासनातर्फे यावर तातडीनं कार्यवाही करत मतदान यंत्र बदलण्यात आली. त्यानंतर या ठिकाणी शांततेत–सुरळीत मतदान झालं.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं एका खासगी वृत्तवाहिनीचे पत्रकार वैभव कनगुटकर यांचं आज सकाळी निधन झालं. आज सकाळी मतदान प्रक्रिया सुरू होताच, वार्तांकनासाठी मतदान केंद्रावर पोहोचलेले वैभव यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केलं असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं.

****

राज्यात निवडणुकीच्या पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या प्रचारात वेग आला आहे. यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्वच मतदारसंघांमध्ये प्रचारानं आता वेग घेतला आहे.

सर्व पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या सभा राज्यात होत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज महायुतीचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ धुळ्यात, तर पालघरमध्ये हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ वसई इथं सभा घेतली.

लोकसभेच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीची १७ मे रोजी वांद्रे कुर्ला संकुलात संयुक्त प्रचार सभा होणार आहे. या सभेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शरद पवार यांच्यासह दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल सहभागी होणार आहेत.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'मुंबई वायव्य' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी मतदानानंतर २४ तासांच्या आत जाहीर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात येत्या शुक्रवारी, १७ मे रोजी सुनावणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीची मतदानाची आकडेवारी प्रकाशित करण्यासाठी निवडणूक आयोग विलंब करत असून, मतदानाच्या दिवशी जाहीर केलेल्या सुरुवातीच्या आकड्यांमध्ये आणि अंतिम आकड्यांमध्ये ५ टक्क्यांहून जास्त फरक असल्याचं या याचिकेत म्हटलं आहे.

****

मतदानाचं प्रमाण वाढावं, यासाठी प्रशासनासोबतच सामाजिक कार्यकर्तेही प्रयत्न करतांना दिसून येतात. छत्रपती संभाजीनगर इथले सामाजिक भान जपणारे केशकर्तनकार सुमीत पंडित यांनी मतदान केलेल्या मतदारांसाठी विशेष योजना राबवली. आकाशवाणीशी बोलतांना त्यांनी या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचं सांगितलं.

****

केंद्र सरकार दरवर्षी २३ प्रकारच्या पिकांच्या हमी भावाची घोषणा करतं. त्या धर्तीवर राज्य सरकार श्रीअन्न अर्थात भरड धान्याच्या ४ पिकांचे हमीभाव जाहीर करणार आहे, अशी माहिती राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तसंच मुख्यमंत्री पर्यावरण आणि शाश्वत विकास कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली.

****

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे बारावीचे निकाल आज जाहीर झाले. या परीक्षेला बसलेले ८७ पूर्णांक ९८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचं प्रमाण गेल्या वर्षपेक्षा ६५ शतांश टक्क्यांनी वाढल्याचं सीबीएसईनं सांगितलं आहे. चोवीस हजार विद्यार्थ्यांनी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त तर एक लाख सोळा हजार विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

****

गडचिरोली जिल्ह्याच्या भामरागड तालुक्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. मृतांमध्ये दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. कतरंगट्टा गावाजवळ जंगलात नक्षलवादी असल्याच्या माहितीवर विशेष अभियानाचे अपर पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वात पोलिसांच्या दोन

तुकड्यांकडून शोध मोहीम सुरु असतांना नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला त्याला पोलिसांनी दिलेल्या प्रत्युत्तरात हे तिघे नक्षलवादी मारले गेले.

****

हवामान विभागानं उद्या १४ मे रोजी छत्रपती संभाजीनगर तसंच जालना जिल्ह्याला यलो अलर्ट दिला आहे. तर, बीड जिल्ह्याला ४८ तासांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या काळात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, तसंच गारांसह पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आजही छत्रपती संभाजीनगरसह जालना जिल्ह्याला हवामान विभागानं आज ऑरेंज अलर्ट तर परभणी, बीड आणि नांदेड जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जाहीर केला होता. मात्र, आज दिवसभरात या भागात उन्हाची तीव्रता कमी होत वातावरण काही काळ अंशत: ढगाळ राहिलं.

मुंबई, ठाणे, कल्याण आदी भागात मात्र आज अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली.

****

आयपीएल टी–ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्सचा सामना होणार आहे. अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी क्रीडा संकुलावर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

****